**केंद्र शासनाकडून PMAY (प्रधानमंत्री आवास योजना) अंतर्गत प्राप्त झालेला निधी सुकाणू अभिकरणास वितरीत करण्याबाबत.**

## महाराष्ट्र शासन
## गृहनिर्माण विभाग
## शासन निर्णय क्रमांकः प्रआयो.२०१६/प्र.क्र.७०/गृनिधो-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ३० ऑक्टोबर,२०१७.

**वाचा -**

1. **अवर सचिव, भारत सरकार,शहरी दारिद्रय निर्मुलन व गृहनिर्माण मंत्रालय,नवी दिल्ली यांचे क्र.I-14011/21/2016-HFA-4 (FTS-15582) दि.२७ मे,२०१६ चे पत्र.**
2. **शासन निर्णय क्रमांकः प्रआयो.२०१५/प्र.क्र.११०/गृनिधो-२ (सेल),दि.९ डिसेंबर,२०१५ .**

**प्रस्तावना -**

केंद्र शासनाकडून PMAY (प्रधानमंत्री आवास योजना) अंतर्गत दि.९ डिसेंबर,२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार निवड केलेल्या ५१ शहरांसाठी रु.५००.०६ लक्ष “सर्वांसाठी घरे कृती आराखडा” (HFAPoA) व वार्षिक अंमलबजावणी आराखडा (AIP) तयार करण्यासाठी राज्यातील शहरनिहाय १ ला हप्ता मंजूर करण्यात आलेला असून तो राज्याच्या एकत्रित निधीत जमा झालेला आहे. सदर निधी सुकाणू अभिकरण म्हणून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांना वितरीत करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

दि.९ डिसेंबर,२०१५ च्या शासन निर्णयातील निवड करण्यात आलेल्या सोबत जोडलेल्या तक्त्यातील ५१ महानगरपालिका/नगरपालिका यांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सर्वांसाठी घरे कृती आराखडा” (HFAPoA) व वार्षिक अंमलबजावणी आराखडा (AIP) तयार करण्यासाठी रु.५००.०६ लक्ष इतका निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर निधीच्या उपयोगाबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्याची सुकाणू अभिकरणाने दक्षता घ्यावी.

या प्रयोजनावर होणारा खर्च मागणी क्र.क्यू-३, मुख्य लेखाशीर्ष २२१६, गृहनिर्माण , ८० सर्वसाधरण, १०३ गृहनिर्माण मंडळे इत्यादींना सहाय्य (०८ ) सर्वांसाठी घरे (०८) ०१ सर्वासाठी घरे अंमलबजावणी यंत्रणा सहायक अनुदाने केंद्र हिस्सा (६०%) ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर)या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

सदर शासननिर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक अर्थसं.-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३,दि.२०.४.२०१६ मधील परिच्छेद -१८ मधील सुचनानुसार राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाला असल्याचे कार्यासन अर्थोपाय यांनी त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रंमाक ३४९/अर्थोपाय, दि.२४.१०.२०१६ अन्वये कळविले आहे.

सदर निधी वित्त नियंत्रक, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांच्या स्वाक्षरीने आणि अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथून आहरित करण्यात यावा. तसेच सदर निधी ज्या प्रयोजनाकरिता मंजुर करण्यात आलेला आहे, त्याच प्रयोजनाकरिता खर्च करणे आवश्यक आहे.

हे आदेश वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक अर्थसं.-२०१६/प्र.क्र.८९/अर्थ-३,दि.२०.४.२०१६ मधील परिच्छेद क्र.६ व १८ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

वरील शासन निर्णय वित्त विभागाच्या दि.२० एप्रिल,२०१६ च्या परिपत्रकातील दिलेल्या सूचनानुसार व प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी वित्त विभाग, शासन परिपत्रक दि.२० एप्रिल,२०१६ मधील परिच्छेद क्र.७ ते १८ येथील अटींची व परिशिष्टातील क्र.९ मध्ये तपासणी सूचीतील अटींची पूर्तता होत आहे, असे प्रमाणित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०३०१५२६४४७००९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ranjeet Annasaheb Patil

Digitally signed by Ranjeet Annasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bf330a8fd32cb0303cd333566a693f1c1b6e21697a18d4ebe592b7edd76c8c25, serialNumber=87806c71f378b24b758ee04ca6ca7e3902af4750ed37382a14676de160fa8bf5, cn=Ranjeet Annasaheb Patil
Date: 2017.10.30 15:13:43 +05'30'

**(रणजीत आ. पाटील)**
शासनाचे अवर सचिव

**प्रत,**

१. मा.राज्यपालांचे सचिव,राजभवन (पत्राने),
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
३. मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानसभा , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन, मुंबई.
६. मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानपरिषद , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधान भवन, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
८. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई-५१.

९. अभियान संचालक, राज्य अभियान संचालनालय (प्रआयो) ,गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई.
१०.महालेखापाल, महाराष्ट्र -१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
११.संबंधित आयुक्त,महानगरपालिक/मुख्याधिकारी,नगरपालिका.
१२.संबंधित कोषागार अधिकारी.
१३.उप सचिव ,वित्त विभाग (कार्या-अर्थ-३) ,मंत्रालय, मुंबई-३२.
१४.सह सचिव ,भारत सरकार, आवास आणि शहरी गरीबी उपशमन मंत्रालय, निर्माण भवन, ५ वा मजला, नवी दिल्ली-११००११ (नोंदणीकृत डाकेने)
१५.सह संचालक, लेखा व कोषागरे कॉम्पुटर सेल, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला,मंत्रालयासमोर, मुंबई.
१६.निवडनस्ती/गृनिधो-२ कार्यासन, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

| Sr.N0. | Name of HFA Cities | Admissible amount for the preparation of HFAPoA as per CSMC approved rate(Rs.in Lakh) | Admissible Central Share (75) (Rs.in Lakh) | Amount Proposed to release as 1 st Instalment (75% of Central Assistance) for the prepatration of HFAPoA (Rs.in Lakh) |
|---|---|---|---|---|
| 1 | AChalpur | 14 | 10.5 | 7.88 |
| 2 | Ahmednagar | 14 | 10.5 | 7.88 |
| 3 | Akola | 14 | 10.5 | 7.88 |
| 4 | Alibaug | 7 | 5.25 | 3.94 |
| 5 | Ambernath | 14 | 10.5 | 7.88 |
| 6 | Amravati | 21 | 15.75 | 11.81 |
| 7 | Aurangabad | 28 | 21 | 15.75 |
| 8 | Badlapur | 14 | 10.5 | 7.88 |
| 9 | Barshi | 14 | 10.5 | 7.88 |
| 10 | Bhandara | 7 | 5.25 | 3.94 |
| 11 | Bhiwandi NiZampur | 21 | 15.75 | 11.81 |
| 12 | Bhusawal | 14 | 10.5 | 7.88 |
| 13 | Bid | 14 | 10.5 | 7.88 |
| 14 | Buldhana | 7 | 5.25 | 3.94 |
| 15 | Chandrapur | 14 | 10.5 | 7.88 |
| 16 | Dhule | 14 | 10.5 | 7.88 |
| 17 | Gadchiroli | 7 | 5.25 | 3.94 |
| 18 | Gondiya | 14 | 10.5 | 7.88 |
| 19 | Greater Mumbai | 35 | 26.25 | 19.69 |
| 20 | Hinganghat | 14 | 10.5 | 7.88 |
| 21 | Hingoli | 7 | 5.25 | 3.94 |
| 22 | Ichalkaranji | 14 | 10.5 | 7.88 |
| 23 | Jalgaon | 14 | 10.5 | 7.88 |
| 24 | Jalana | 14 | 10.5 | 7.88 |
| 25 | Kalyan Dombivali | 28 | 21 | 15.75 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 26 | Kolhapur | 21 | 15.75 | 11.81 |
| 27 | Latur | 14 | 10.5 | 7.88 |
| 28 | Malegaon | 14 | 10.5 | 7.88 |
| 29 | Mira Bhayander | 21 | 15.75 | 11.81 |
| 30 | Nagpur | 35 | 26.25 | 19.69 |
| 31 | Nanded Waghala | 21 | 15.75 | 11.81 |
| 32 | Nandurbar | 14 | 10.5 | 7.88 |
| 33 | Nashik | 28 | 21 | 15.75 |
| 34 | Navi Mumbai | 28 | 21 | 15.75 |
| 35 | Osmanabad | 14 | 10.5 | 7.88 |
| 36 | Panvel | 14 | 10.5 | 7.88 |
| 37 | Parbhani | 14 | 10.5 | 7.88 |
| 38 | Pimpri chinchwad | 35 | 26.25 | 19.69 |
| 39 | Pune | 35 | 26.25 | 19.69 |
| 40 | Ratnagiri | 7 | 5.25 | 3.94 |
| 41 | Sangli- Miraj Kupwad | 21 | 15.75 | 11.81 |
| 42 | Satara | 14 | 10.5 | 7.88 |
| 43 | Sawantwadi | 7 | 5.25 | 3.94 |
| 44 | Solapur | 21 | 15.75 | 11.81 |
| 45 | Thane | 35 | 26.25 | 19.69 |
| 46 | Udgir | 14 | 10.5 | 7.88 |
| 47 | Ulhasnagar | 21 | 15.75 | 11.81 |
| 48 | Vasai-Virar city | 28 | 21 | 15.75 |
| 49 | Wardha | 14 | 10.5 | 7.88 |
| 50 | Washim | 7 | 5.25 | 3.94 |
| 51 | Yavatmal | 14 | 10.5 | 7.88 |
| | Total | 889 | 66.75 | 500.06 |